# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### धारणी (जि.अमरावती) तालुक्यात पेसा निधीतील लाखोच्या आरओ प्लांटमशीन धूळखात पडून असल्याबाबत

**(१) ३८०८ (१६-०४-२०२०). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) अमरावती जिल्हयातील पंचायत समिती धारणींतर्गत ३० ग्रामपंचायतींमध्ये आदिवासींना शुध्द पाणी मिळण्यासाठी पेसा कायदा निधींतर्गत २ वर्षापूर्वी ३ लाख प्रति नगाप्रमाणे ३० आरओ प्लांटचे साहित्य खरेदी करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरओ प्लांट काही ग्रामपंचायतींनी ग्रामपंचायतीमध्ये न लावता जुटपाणी ग्रामपंचायतच्या आवारात भंगार अवस्थेत फेकून दिले, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आदिवासींच्या हक्काचा पेसा निधीचा दुरुपयोग करणाऱ्या ग्रामसेवक व विस्तार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०६-०९-२०२३) :** (१) अशंत: खरे आहे.

अमरावती जिल्हयातील पंचायत समिती धारणींतर्गत असलेल्या ग्रामपंचायतींपैकी २५ ग्रामपंचायतींनी २८ आर. ओ. प्लांट मशीन खरेदी केल्या आहेत.

(२) हे खरे नाही.

सर्व आर. ओ. प्लांट कार्यरत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) निरंक.

---

### सातारा जिल्हयातील ग्रामपंचायतीमधील कर्मचाऱ्यांना किमान वेतन देण्याबाबत

**(२) १३२३० (११-०९-२०२०). श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना संक्रमण काळात सातारा जिल्हयातील १ हजार ४९६ ग्रामपंचायतीमधील कर्मचाऱ्यांनी कोरोना प्रादुर्भाव रोखण्यासाठी ग्रामस्थांमध्ये समाजप्रबोधनाचे कार्य माहे मार्च,२०२० पासून ते अद्यापपर्यंत केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सर्व कर्मचाऱ्यांना आर्थिक वर्षातील करवसुलीच्या टक्केवारीनुसार वेतन देण्याच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार वेतन न देता त्यांना चालू वर्षी निश्चित किमान वेतन देण्याचे आदेश शासनाने माहे एप्रिल,२०२० मध्ये वा त्यादरम्यान निर्गमित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामपंचायतीमधील कर्मचाऱ्यांना किमान वेतन देण्याचा शासनाने निर्णय घेऊनही त्यांची अद्याप अंमलबजावणी झाली नसल्याचे माहे जुलै,२०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१३-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
दि. २८ एप्रिल, २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये आर्थिक वर्ष सन २०२०-२०२१ या कालावधीतील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना देण्यात येणारे किमान वेतनासाठी सहायक अनुदान करांच्या वसुलीच्या टक्केवारीशी न जोडता ग्रामपंचायतीच्या लोकसंख्या व उत्पन्नानुसार अदा करण्याबाबत निर्णय घेण्यात आला होता.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अहमदनगर जिल्ह्यात लेखाशिर्ष २५१५ अंतर्गत विकासकामांना वितरीत केलेल्या निधीचा विनियोग केला नसल्याबाबत

**(३) १३३१५ (११-०९-२०२०). श्री.बबनराव पाचपुते (श्रीगोंदा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २०१९-२०२० मध्ये अहमदनगर जिल्ह्यात लेखाशिर्ष २५१५ अंतर्गत विकासकामांना निधी वितरीत केला होता त्याचा विकासकामांवर विनियोग झाला नसल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच श्रीगोंदा, ( जि.अहमदनगर ) या तालुक्यास विकासकामांसाठी निधी वितरीत न करण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त विकासकामांना वितरीत केला गेलेल्या निधीचे स्वरुप काय आहे तसेच त्याचा तालुकानिहाय वर्गीकरणाचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, प्रस्तुत प्रकरणी होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०६-०९-२०२३) :** (१) नाही, हे खरे नाही. लेखाशिर्ष २५१५ १२३८ अंतर्गत सन २०१९-२० मध्ये अहमदनगर जिल्ह्यात रक्कम रु.३७८९.९९ लक्ष इतक्या रक्कमेच्या एकूण ३०३ कामांस मंजूरी देण्यात आली आहे.
(२) अंशत: खरे आहे. श्रीगोंदा तालुक्यास लेखाशिर्ष २५१५ १२३८ अंतर्गत सन २०१९-२० करिता कामे मंजूर नाही. तथापि, लेखाशिर्ष ३०५४ २४१९ व ३०५४ २१४१ खाली अनुक्रमे राज्य व जिल्हा स्तरावरून एकूण रु.२५३.०० लक्ष इतक्या रक्कमेची २२ विकास कामे मंजूर आहेत.
(३) लेखाशिर्ष २५१५ १२३८ अंतर्गत सन २०१९-२० करिता कामांचे व निधीचे तालुकानिहाय स्वरुप व वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे.

| तालुका | मंजूर कामे | निधी (लक्ष) |
|---|---|---|
| नगर | ५ | ९०.०० |
| कर्जत | १४८ | १५२८.०० |
| जामखेड | ५६ | ४९२.०० |
| पाथर्डी | २ | ४९.०० |

| | | |
|---|---|---|
| शेवगाव | १५ | २००.०० |
| नेवासा | २८ | ३६९.९९ |
| राहूरी | २० | ४६१.०० |
| कोपरगाव | २६ | ५४०.०० |
| राहाता | ३ | ६०.०० |

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौ. आसेगाव (ता. वसमत,जि.हिंगोली) येथील जैन मंदीर आणि श्रीक्षेत्र बाराशिव हनुमान मंदिराच्या विकास कामांना मंजूरी व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४) ३४९१७ (१२-०१-२०२२). श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ. आसेगाव (ता. वसमत,जि.हिंगोली) येथे जैन समाजाचे पुरातन दुर्मिळ मंदीर असून येथे प्रत्येक वर्षी यात्रा भरत असून येथे येणाऱ्या भाविकांसाठी सोयीसुविधा उपलब्ध नसल्याने त्यांची गैरसोय होते, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, येथे चर्तुमुखी विनायक उच्च माध्य.शाळा ते जैन मंदिर पालखी मार्गावर पेव्हर ब्लॉक व पथदिवे बसविणे, मंदिर परिसरात टिन शेड सभामंडपाचे बांधकाम करणे इत्यादी सोयीसुविधा भाविकांना उपलब्ध करुन देण्याची मागणी दिनांक २७/०६/२०२१ रोजी तसेच श्रीक्षेत्र बाराशिव हनुमान मंदिर तिर्थक्षेत्राच्या विकासासाठी पर्यटन व ग्रामीण क्षेत्र विकास कार्यक्रम (राज्यस्तर) अंतर्गत सन २०२१-२२ अंतर्गत निधी उपलब्ध करुन देण्यात यावा अशी विनंती संबंधित लोकप्रतिनिधीनी दिनांक २३जून,२०२१ रोजी मा.पर्यटन विकास राज्यमंत्री यांचेकडे लेखी पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या श्री जैन मंदिर आणि क्षी क्षेत्र बाराशिव हनुमान मंदिर तिर्थक्षेत्राच्या विकास कामांना प्रादेशिक पर्यटन विकास योजना २०२१-२२ अंतर्गत मंजूरी व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०८-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) श्री. बाराशिव हनूमान मंदिर बाराशिव, ता. बसमत जि.हिंगोली येथील कामाबाबत डॉ. जयप्रकाश मुंदडा, माजी सहकार मंत्री, यांनी दि.०४/०३/२०२० च्या पत्रान्वये तत्का. मंत्री (पर्यटन) यांना विनंती केली होती.

तसेच, चर्तुमुखी विनायक उच्च माध्य. शाळा ते जैन मंदिर पालखी मार्गावर पेव्हर ब्लॉक व पथदिवे बसविणे, मंदिर परिसरात टिन शेड सभामंडपाचे बांधकाम करणे इत्यादीबाबत श्री. चंद्रकात नवघरे, मा. वि.स.स (वसमत) यांनी दि.०६/०३/२०२२ च्या पत्रान्वये तत्का. राज्यमंत्री (पर्यटन) यांना विनंती केली होती.

(३) श्री क्षेत्र बाराशिव हनुमान मंदिर, बाराशिव, ता. बसमत जि.हिंगोली येथील रु.२००.०० लक्ष किंमतीच्या विकास कामांना प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंतर्गत शासन निर्णय, दि. ३१/०३/२०२२ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून रु.५०.०० लाख इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पेसा कायद्यानुसार अनुसूचित क्षेत्रातील स्थानिक स्वराज्य संस्थेत (ग्रामपंचायत, पंचायत समिती,जिल्हा परिषद) राजकीय आरक्षण मिळणेबाबत**

**(५) ३५७४५ (०६-०१-२०२२). डॉ.संदीप धुर्वे (अर्णी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८, जिल्हा परिषद व पंचायत अधिनियम १९६१ नुसार बिगर अनुसूचित क्षेत्राला जे आरक्षण दिले जाते तेच अनुसूचित क्षेत्रालाही दिले जाते हे खरे आहे काय,

(२) असल्यास,अनुसूचित क्षेत्रात पेसा कायद्यानुसार आरक्षण देण्याची तरतूद आहे.हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पेसा कायद्यानुसार अनुसूचित क्षेत्राला आरक्षण देण्यात येते.हे ही खरे आहे काय,

(४) नसल्यास, पेसा कायद्यानुसार आरक्षण देण्याची तरतूद करण्यासाठी शासनाची कोणती कार्यवाही केली करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०६-०९-२०२३) :** (१) नाही, हे खरे नाही.

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ आणि जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ नुसार अनुसूचित क्षेत्रासाठी पंचायतीसंबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारीत करणे) अधिनियम, १९९६ नुसार आरक्षण लागू करण्यात आलेले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे शेलवड (ता.बोदवड, जि. जळगांव) ग्रामपंचायतीमध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(६) ३९०३४ (०१-०४-२०२२). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे शेलवड (ता.बोदवड, जि. जळगांव) ग्रामपंचायत येथील २७ मृत व्यक्तीच्या नावे शौचालयाचा लाभ दिल्याचे शासनाने माहे डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यादरम्यान केलेल्या चौकशीत निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी अपहारीत रक्कम वसूलीची नोटिस ग्रामसेवक व सरपंच यांना दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच संबधित दोषीविरुध्द १५ व्या वित्त आयोगांतर्गत प्राप्त निधीचा अपहार केल्याबाबत निलंबित करुन त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, त्यानुसार संबंधीतांकडून अपहारीत रक्कम वसूल करण्याबाबत तसेच निलंबनासह शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१३-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) होय, हे खरे आहे.

या प्रकारणातील संबधित जबाबदार ग्रामसेवक यांना १५ व्या वित्त आयोगामार्फत प्राप्त निधीचा अपहर प्रकरणी निलंबित करण्यात आले असून त्यांच्या विरुद्ध शिस्तभंग कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे. तसेच तत्कालीन

सरपंच व संबधित जबाबदार ग्रामसेवक यांचे विरुद्ध बोदवड, पो.स्टे. भाग-५, गुरनं. ७२/२०२२,भा.दं.वि. कलम ४२०, ४१९, ४०९, ४६७, ४६९, ४७१ व ३४ प्रमाणे फौजदारी गुन्हा दाखल केला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सालेकसा (जि.गोंदिया) तालुक्यातील आदिवासी बहुल गाव चिंगलूटोला (खेडेपार) येथे गावापर्यंत जाण्यासाठी पक्का रस्ता तयार करण्याबाबत**

**(७) ४०९३९ (१२-०४-२०२२). श्री.सहसराम कोरोटे (आमगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सालेकसा (जि.गोंदिया) तालुक्यातील आदिवासी बहुल गाव चिंगलूटोला (खेडेपार) येथे गावापर्यंत जाण्यासाठी पक्का रस्ता तयार करण्याबाबत नागरिकांनी वारंवार मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बहुल गाव चिंगलूटोला (खेडेपार) येथे गावापर्यंत जाण्यासाठी पक्का रस्ता तयार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१३-०९-२०२३) :** (१) होय.
(२) खेडेपार ते चिंधूटोला रस्ता सन २०१८-१९ या वर्षात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतंर्गत मंजूर असून रस्त्याचे काम माहे डिसेंबर,२०२२ अखेर पूर्ण झाले आहे.
(३) प्रश्नच उद्भवत नाही.

---

**निलंगा (जि.लातूर) तालुक्यातील कासारसिरशी ते कोराळीवाडी - कोराळी ते राज्य सरहद्द रस्त्याच्या दुरुस्तीबाबत**

**(८) ४३५७० (३१-०३-२०२२). श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), अ‍ॅड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) निलंगा (जि.लातूर) तालुक्यातील कासारसिरशी ते कोराळीवाडी - कोराळी ते राज्य सरहद्द इजिमा-९४ रस्ता अत्यंत खराब झाला असून वाहतुकीस गैरसोयीचा झाल्याने सदरील रस्त्याची सुधारणा कामास दिनांक २९/०६/२०१९ च्या शासन निर्णयानुसार प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती परंतु दिनांक १५/०४/२०२० च्या शासन निर्णयानुसार सदरील प्रशासकीय मान्यता रद्द करण्यात आली आहे हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील रस्ताची दुरवस्था झाल्याने व वाहतुकीची वर्दळ असल्याने गैरसोयीचा झाल्याने पुनश्च प्रशासकीय मान्यता देण्याबाबत औसा विधानसभा स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी अधीक्षक अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना औरंगाबाद विभाग, औरंगाबाद तसेच कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना लातूर यांना दिनांक १६/०७/२०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने सदरहू रस्त्याची सुधारणा करणेबाबत तसेच निधीसह पुनश्च मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१३-०९-२०२३) :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर रस्त्याच्या काम PMGSY-III,बॅच-१ सन २०२२-२३ अंतर्गत मान्यता प्राप्त असून पुढील कार्यवाही प्रगतीप्रथावर आहे.
(४) प्रश्नच उद्भवत नाही,

---

## आच्छि हिसपूर ते विरदेल, चिलाणे ते विंदयासिणी माता मंदिर ते रंजाणे, गव्हाणे ते टेमलाय (ता.शिंदखेडा, जि.धुळे) या रस्त्यांना मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून मंजूरी देणेबाबत

**(९) ४५०२९ (०७-१०-२०२२). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आच्छि हिसपूर ते विरदेल, चिलाणे ते विंदयासिणी माता मंदिर ते रंजाणे, गव्हाणे ते टेमलाय (ता.शिंदखेडा, जि.धुळे) येथील या रस्त्यांना मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून मंजूरी द्यावी अशी मागणी संबंधीत गावातील ग्रामस्थांनी शासनाकडे सातत्याने केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे हिसपूर, आच्छि या गावांना मुख्य रस्त्याला जोडणारा हा एकमेव मार्ग असून अद्यापही याठिकाणी डांबरीकरणही झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, त्याअनुषंगाने उक्त योजनेस त्वरीत मंजूरी मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१३-०९-२०२३) :** (१),(२), व (३)आच्छि ते हिसपुर ते विरदेल रस्ता प्रजिमा म्हणुन दर्जोन्नत झाला असल्याने मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेत समाविष्ट करता येणार नाही. तसेच चिलाणे ते विद्यासिनी माता मंदिर ते रंजाणे रस्ता व गव्हाणे ते टेमलाय रस्त्याबाबत मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे प्रचलित धोरण,उपलब्ध निधी, प्राथम्यक्रमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल.

(४) निरंक.

---

## महागांव तालुक्यातील( जि.यवतमाळ ) लेवा ते बारभाई तांडा या गावांना जोडणाऱ्या रस्त्यांची झालेली दूरवस्था

**(१०) ४६८११ (०९-१०-२०२२). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महागांव तालुक्यातील ( जि.यवतमाळ ) लेवा ते बारभाई तांडा या गावांना जोडणारा रस्ता मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून सुमारे एक कोटी २७ लाख रुपये खर्चून करण्यात आला असूनही या रस्त्यांची अत्यंत दूरवस्था झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर रस्त्यांच्या निकृष्ट कामांची पाहणी व चौकशी करण्यात आली आहे काय, तसेच पहाणी अंती काय निदर्शनास आले,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशीनुसार संबधित अधिकारी व ठेकेदारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१३-०९-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

सदर रस्त्याचे काम एम.पी.एम. पूर्ण झाल्यानंतर अति पर्जन्यामूळे रस्त्याची दुरुवस्था झाली,मात्र सद्यस्थितीत कंत्राटदारामार्फत मानकाप्रमाणे काम पुर्ण करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्नच उद्भवत नाही.

(४) निरंक.

---

**वरणगाव (ता.भुसावळ, जि.जळगांव) येथील तिर्थश्रेत्र नागेश्वर महादेव मंदिराच्या कामास मंजूर निधी देण्याबाबत**

**(११) ४६९६५ (१७-०९-२०२२). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरणगाव (ता.भूसावळ, जि.जळगांव) येथील तिर्थश्रेत्र नागेश्वर महादेव मंदिराला तिर्थक्षेत्र विकास योजनेंतर्गत २ कोटी ७४ लाख मंजुर झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मंदिराचे काम निधी अभावी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार मंदिराच्या कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०८-०९-२०२३) :** (१) होय.

प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंतर्गत शासन निर्णय क्र. बैठक २०१८/१२/प्र.क्र.११५३/जळगाव/ पर्यटन, दिनांक १८/०२/२०१९ च्या शासन निर्णयान्वये वरणगाव (ता.भुसावळ, जि. जळगांव) येथील नागेश्वर महादेव मंदिर परिसराचा विकास करणेबाबत रू. २७७.०३ लक्ष इतक्या निधीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून त्यापैकी रू. ३५.०० लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

(२) व (३) सदर मंदीरासाठी उपलब्ध सन २०१९-२० करिता उपलब्ध करून देण्यात आलेला रू. ३५.०० लक्ष इतका निधी खर्चाबाबत उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त झाले असून उर्वरीत निधी उपलब्ध करून देणेबाबत शासन स्तरावरून कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देवठाणा-पिंप्री, (ता.मानोरा, जि.वाशीम) येथील ४ कि.मी. रस्त्याचे काम तातडीने पुर्ण करण्याबाबत**

**(१२) ४७७०७ (१०-११-२०२२). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवठाणा-पिंप्री, (ता.मानोरा, जि.वाशीम) या ४ कि.मी. रस्त्याचे काम पंतप्रधान ग्रामसडक योजनेमधून दोन वर्षापूर्वी मंजूर झाले असून सदर काम आतापर्यंत सुरू झाले नसल्याने सदर रस्त्याचे काम तातडीने करण्याबाबतची मागणी पंचायत समितीच्या सदस्यांनी व स्थानिक नागरिकांनी दिनांक १५ जून,२०२२ रोजी वा त्या सुमारास शासनास व संबंधीत विभागाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने काय आढळून आले, तदनुसार उक्त मागणीकरीता संबंधीत विभागामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१३-०९-२०२३) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

सदर काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून मंजुर असून प्रगतीप्रथावर आहे.

(२) व (३) प्रस्तुत रस्त्यासाठी नाली खोदकामासाठी स्थानिक शेतक-यांचा विरोध,सिंचन तलावाच्या बुडीत क्षेत्रातील कामास सिंचन विभागाच्या परवानगीस विलंब,तसेच निधीची कमी उपलब्धता इत्यादीमूळे कामास विलंब झाला आहे,माहे डिसेंबर २०२३ अखेर काम पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

**चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयात बनावट एफडीआरच्या नावावर कोटयावधीची कंत्राटे मिळवली जात असल्याबाबत**

**(१३) ४८१०७ (०७-११-२०२२). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयात कोटयावधी रुपयांची कंत्राटे मिळविण्यासाठी कंत्राटदारांकडून कोटयावधी रुपयांचे बनावट एफडीआर दाखविले जात असल्याचे माहे मार्च,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कंत्राटदारांकडून कामे निकृष्ट दर्जाची होत असल्याने शासनाचे मोठया प्रमाणावर नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी निविदा घोटाळयाची चौकशी करुन उक्त गैरप्रकार रोखण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१३-०९-२०२३) :** (१) अशंत: खरे आहे. गडचिरोली जिल्ह्यात एका कंत्राटदाराने बनावट एफडीआर सादर केल्याचे तसेच तीन कंत्राटदारानी जिल्हा परिषदेची परवानगी न घेता परस्पर एफडीआरची रक्कम उचल केल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) हे खरे नाही. गुणवत्ता अहवालानुसार सदर चारही कंत्राटदारांनी केलेली कामे दर्जेदार आहेत.

(३) चार कंत्राटदारांपैकी २ कंत्राटदारांवर ग्राम विकास विभाग, शासन निर्णय दि.०७ डिसेंबर, २०२१ मधील तरतूदीनुसार दंडात्मक कार्यवाही करण्याबाबतची कार्यवाही केली असून दोन्ही कंत्राटदारांस एक वर्षासाठी काळया यादीत टाकण्यात आले आहे. उर्वरित २ कंत्राटदारांवर उपरोक्त नमूद शासन निर्णयातील तरतूदीनुसार कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जिल्हा परिषद, बीड अंतर्गत शिक्षण विभागात शिक्षक, मुख्याध्यापक व इतर कर्मचाऱ्यांची वैद्यकीय देयके प्रलंबित असल्याबाबत**

**(१४) ५०६७२ (२०-०१-२०२३). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद.बीड अंतर्गत शिक्षण विभागात शिक्षक, मुख्याध्यापक व इतर कर्मचाऱ्यांचे वैद्यकीय देयके मोठ्या प्रमाणात प्रलंबित असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी किती कर्मचाऱ्यांची वैद्यकीय देयके प्रलंबित आहेत,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्नुषंगाने उक्त प्रलंबित वैद्यकीय देयके कर्मचाऱ्यांना मिळणेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (११-०९-२०२३) :** (१) हे खरे आहे.

वैद्यकीय देयकाची रक्कम अदा करण्यासाठी अनुदान प्राप्त झाले नसल्यामुळे जिल्हा परिषद, बीड अंतर्गत शिक्षक, मुख्याध्यापक व इतर कर्मचाऱ्यांचे वैद्यकीय देयके प्रलंबित आहेत.

(२) जिल्हा परिषद, बीड अंतर्गत शिक्षण विभागात एकूण २०० वैद्यकीय देयके प्रलंबित आहेत.

(३) व (४) वैद्यकीय देयके अदा करण्यासाठी अनुदान प्राप्त झालेले नाही. सध्या उपलब्ध असलेल्या अनुदानामधून मासिक वेतनाव्यतिरिक्त इतर कोणतेही लाभ अदा करण्यात येऊ नयेत अशा सूचना आहेत. त्यामुळे सदर देयके प्रलंबित

आहेत. तथापि, वैद्यकीय देयक अदा करण्यासाठी जिल्हा परिषदेने शिक्षण आयुक्त कार्यालयाकडे मागणी केली असून अनुदान प्राप्त होताच तातडीने सदर वैद्यकीय देयके अदा करण्यात येतील.

---

**रायगड जिल्हयातील २१ प्रशासकीय कार्यालयांचा कारभार ५९ वर्षापासून भाडयाच्या जागेत सुरु असल्याबाबत**

**(१५) ५१३०५ (२०-०१-२०२३). श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील २१ प्रशासकीय कार्यालयांचा कारभार ५९ वर्षापासून भाडयाच्या जागेत सुरु असल्याचे माहे ऑक्टोंबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सर्व प्रशासकीय कार्यालयांच्या जागेच्या भाडयासाठी दर महिन्याला ६० लाखांहून अधिक निधी खर्च होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू कार्यालये नसल्याने दैनंदिन कामकाजासाठी येणाऱ्या नागरिकांची मोठी गैरसोय होत असल्याने शासनाने जिल्हयातील सर्व सरकारी कार्यालये एकाच छताखाली यावीत यासाठी प्रशासकीय भवन संकल्पना राबविण्याचे जाहिर केले आहे, हे ही खरेआहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्नुषंगाने शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१३-०९-२०२३) :** (१), (२), (३) व (४) नाही, अशी बाब नाही.

जिल्हा परिषद, रायगड (जि. रायगड) येथील नविन प्रशासकीय इमारत बांधकामाचा परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यास यांसदर्भात निधी, निकष, प्राथम्य क्रम व प्रचलित कार्यपद्धतीनुसार कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून करण्यात आलेला ठाणगाव-बेडसे रस्त्याच्या निकृष्ठ कामाबाबत**

**(१६) ५१८२१ (२१-०१-२०२३). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुरगणा तालुक्यातील पश्चिम भागातील इंगळीपाडा बेडसे येथे महाराष्ट्र ग्रामीण विकास संस्थेअंतर्गत मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून दिड कोटी रुपये खर्च करुन बांधण्यात आलेल्या रस्त्याचे काम निकृष्ठ झाल्यामुळे पहिल्याच पावसात रस्ता वाहून गेल्याचे माहे जुलै, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेथील खिर्डी, भाटी, केळावण,आंबोडा, झगडपाडा, भेनशेत वडपाडा सागपाडा अशा २० ते २५ गावांतील नागरिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार रस्त्याचे निकृष्ठ बांधकाम करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१३-०९-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्नच उद्भभवत नाही.

(४) निरंक.

---

**अमरावती येथील जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय इमारतीचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(१७) ५२३८४ (२०-०१-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हा परिषदेची ब्रिटिशकालीन इमारत जीर्ण झाली असून प्रशासकीय कामकाजाच्या दृष्टीने अपूरी असल्याने सदर मुख्यालयातील कृषी, शिक्षण आणि जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा हा विभाग अन्य ठिकाणी कार्यरत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषद अमरावतीच्या नवीन प्रशासकीय इमारत बांधकामास दिनांक २२ जुलै, २०२१ रोजी ४९ कोटी ८३ लक्ष रुपयांचा प्रशासकीय निधी प्राप्त झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावास एक वर्षाचा कालावधी होवूनही नवीन प्रशासकीय इमारत बांधकामास शासनाने निधीची तरतूद केली नसल्याने उक्त इमारतीचे काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने उक्त इमारतीच्या बांधकामास निधीची तरतूद तातडीने करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१३-०९-२०२३) :** (१), (२), (३) व (४) होय,

ग्राम विकास विभागाच्या दिनांक २२ जुलै, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये, जिल्हा परिषद, अमरावती (जि.अमरावती) येथील नविन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाच्या रु.४९८३.०० लक्ष इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली असून यांसदर्भात निधी, निकष, प्राथम्य क्रम व प्रचलित कार्यपद्धतीनुसार कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केज (जि. बीड) येथील पंचायत समिती कार्यालयाचे व कर्मचारी निवासस्थानाच्या कामासाठी निधी उपलब्ध करणेबाबत**

**(१८) ५३७७० (२१-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केज (जि. बीड) येथील पंचायत समिती कार्यालयाचे व कर्मचारी निवासस्थानाच्या नवीन ईमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून उक्त इमारतीसाठी अत्यंत आवश्यक असलेली १) संरक्षक भिंत बांधकाम करणे व २) केज पंचायत समिती कर्मचारी निवासस्थानातील इलेक्ट्रीकल वर्क्स चे काम निधी अभावी प्रलंबित असून त्यासाठी निधी उपलब्ध करून देणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी ग्रामविकास मंत्री यांच्याकडे दिनांक १३/१०/२०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्नुषंगाने सदर कामांसाठी किती निधी उपलब्ध करण्यात आला आहे, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१३-०९-२०२३) :** (१) व (२) नाही,

पंचायत समिती, केज (जि. बीड) येथील प्रशासकीय इमारतीच्या बांधकामास शासनाकडून रु.४९३.३३ लक्ष व पंचायत समिती, केज (जि. बीड) येथील शासकीय निवासथान इमारतीच्या बांधकामास शासनाकडून रु.३५७.१० लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. उर्वरीत निधी बांधकामाच्या प्रगतीनुसार वितरीत करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## केज (जि. बीड) येथील मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत रद्द केलेल्या २४ रस्त्यांच्या कामांना मंजुरी देणेबाबत

**(१९) ५५४४८ (२१-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्यातील केज तालुक्यात सन २०१४ - २०१९ या कालावधीत मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत मंजूर २४ रस्त्यांची काम तत्कालीन शासनाने रद्द केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ते हे अत्यंत महत्वाचे असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी या बाबत शासनस्तरावर सतत पाठपुरावा केला असून उक्त प्रकरणी मा. उच्च न्यायालयातही पिटीशन दाखल केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी दि. २५ मार्च २०२२. रोजी वित्तीय नियंत्रक तथा उपसचिव, ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी केज मतदार संघातील रद्द केलेली २४ कामे प्राधान्याने, मुख्यमंत्री ग्राम सडक योजना टप्पा-०२ मध्ये मंजूर होणाऱ्या उदिष्टामध्ये चालू वर्षात समावेश करण्याची कार्यवाही करण्याबाबत संबंधित अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता यांना निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार उक्त ठिकाणच्या मुख्यमंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत मंजूर २४ रस्त्यांच्या कामांना मंजुरी देण्यासह निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१३-०९-२०२३) :** (१),(२) व (३) होय,हे खरे आहे.

(४) सदर नमुद २४ कामांपैकी १३ कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.उर्वरीत ११ कामांपैकी ४ कामे ही Non-Plan असल्याने त्यांना मंजुरी प्रदान करता येणार नाही, तसेच ७ कामांच्या बाबतीत प्रचलित निकष,उपलब्ध निधी व प्राथम्यक्रमानुसार समावेश करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

(५) निरंक

---

## वर्धा जिल्ह्यातील आर्वी विधानसभा मतदार संघातील नदी किनाऱ्यावर असलेल्या गावांकरिता संरक्षण भिंत उभारण्यास निधी मिळणेबाबत

**(२०) ५५६६८ (२१-०१-२०२३). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्वी विधानसभा मतदार संघातील गावांना वर्धा नदी, बाकळी नदी, व आड नदी किनाऱ्यावरील गावांना दरवर्षी पावसाळयामध्ये येणाऱ्या पुराच्या पाण्याचा धोका निर्माण होतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजा साहुर, (ता.आष्टी) येथील धाडी, सिरसोली, खडकी, जुना अंतोरा, चिस्तुर, वाघोली, आनंदवाडी, टेकोडा, खंबित, गोदावरी, लहान आर्वी, थार, नविन आष्टी, चामला, कारंजा तालुक्यातील मौजा सुसुंद्रा व आर्वी तालुक्यातील देऊरवाडा, राजापूर, शिरपुर, नांदपूर, खरांगणा/मोरांगणा, वाई, काचनुर, मदना, रोहणा, इत्यादी गावांना पुराचा धोका निर्माण होतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त गावांच्या संरक्षणाकरीता मा. लोकप्रतीनिधी यांनी दिनांक ०१/१०/२०२२ रोजी वा त्यासुमारास संरक्षण भिंतीचे बांधकाम करण्याकरिता निधीची मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने चौकशी केली आहे काय, तद्रुषंगाने उक्त संरक्षण भिंतीच्या बांधकामास निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०६-०९-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) याबाबत मा. लोकप्रतीनिधींचे शासनास प्रत्यक्ष प्रस्ताव प्राप्त नाही. मात्र या मागणीच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांनी दि. ०६.०२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये उक्त संरक्षण भिंतीच्या बांधकामाकरिता रु. २५.१६ कोटी इतक्या निधीचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. सदर प्रस्ताव नस्ती क्र. विकास-२०२३/प्र.क्र. १६४/यो-६ वर शासन मान्यतेस्तव सादर केला असून अद्याप याबाबत अंतिम निर्णय झालेला नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर जिल्हा परिषदेच्या पारशिवनी पंचायत समितीच्या शिक्षण विभागातील निवृत्तीवेतन घोटाळयाबाबत

**(२१) ५६५४७ (२४-०४-२०२३). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्हा परिषदेच्या पारशिवनी पंचायत समितीच्या शिक्षण विभागातील निवृत्तीवेतन घोटाळा १ कोटी ८६ लाख ५७ हजार १२७ रुपये झाल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान उघडकीस आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गटविकास अधिकारी आणि गट शिक्षणाधिकाऱ्यांसह दहा जणांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१३-०९-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) होय,
श्रीमती सरिता चंद्रशेखर नेवारे, कनिष्ठ सहाय्यक यांनी बनावट निवृत्ती वेतन धारकांचे खोटे पी.पी.ओ. क्रमांक दर्शवून स्वत:च्या, पतीच्या व अन्य नातेवाईकांच्या नावे असलेल्या १७ बँक खात्यामध्ये निवृत्ती वेतन निधी रु. १,८६,५७,१२५/- व अन्य १४ बँक खाते धारक यांच्या खात्यात रु.८८,३६,८६५/- असे एकूण ३१ बँक खात्यामध्ये एकूण रु. २,७४,९३,९९०/- एवढ्या रकमेचा अपहार केला आहे.
सदर अपहार प्रकरणी श्रीमती सरिता चंद्रशेखर नेवारे, कनिष्ठ सहाय्यक व अन्य व्यक्तींवर दि.१६.११.२०२२ रोजी फौजदारी गुन्हा दाखल केला आहे. तसेच श्रीमती नेवारे, कनिष्ठ सहाय्यक यांचेविरुद विभागीय चौकशी प्रस्तावित केली असून कार्यरत कालावधीतील गट विकास अधिकारी, गट शिक्षणाधिकारी, सहाय्यक लेखा अधिकारी, कनिष्ठ लेखा अधिकारी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, रोखपाल असे एकूण १६ अधिकारी/कर्मचारी यांना मुद्देनिहाय कारणे दाखवा नोटीस दि. ०२.५.२०२३ रोजी देण्यात आली आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धाडरे ते हाडादड (जि.धुळे) गावाच्या दरम्यान वाहणाऱ्या नदीवर पुलाचे बांधकाम करण्याबाबत

**(२२) ५६५६६ (२४-०४-२०२३). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धाडरे ते हाडादड (जि.धुळे) गावाच्या दरम्यान वाहणाऱ्या बोरी नदीवर पुलाचे बांधकाम करून विद्यार्थी, शेतकरी, शेतमजूर व ग्रामस्थांची दळणवळणाची होणारी गैरसोय दूर करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य किसान सभा व स्थानिक लोकप्रतिनिधींनी निवेदनाद्वारे शासनाकडे दिनांक ५ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणी लक्षात घेता धुळे तालुक्यातील धाडरे ते हाडादड दरम्यान बोरी नदीवर पुलाचे बांधकाम करण्यासाठी शासन मंजुरी देणार आहे काय,

(३) असल्यास, कधीपर्यंत सदर पुलाचे बांधकाम करण्याचे नियोजन हाती घेण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०८-०९-२०२३) :** (१) अशाप्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.
(२) व (३) धुळे तालुक्यातील धाडरे ते हाडादड रस्ता ग्रामीण मार्ग क्र.१४२ दर्जाचा असून सदर रस्त्याच्या सा.क्र.१/२०० मध्ये बोरी नदी आहे. सदर ठिकाणी ११० मीटर लांबीचा नवीन पूल बांधणे आवश्यक आहे. सदरचा पूल मोठ्या स्वरुपाचा असल्यामुळे पूलाचे काम नाबार्ड अंतर्गत प्रस्तावित करण्याबाबत जिल्हा परिषदेमार्फत सार्वजनिक बांधकाम विभाग, धुळे यांना कळविण्यात आले आहे.

सद्यस्थितीत हाडादड ते धाडरे या रस्त्यास हाडादड - राममा-३ - इजिमा-२९ - धाडरे हा ८.५० कि.मी. लांबीचा पर्यायी मार्ग उपलब्ध आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील कुस्तीगिरांच्या मानधनाबाबत

**(२३) ५६७७९ (२६-०४-२०२३). श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.विनोद निकोले (डहाणू), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) श्रीमती सरोज आहिरे (देवळाली ,नाशिक), श्रीमती आश्विनी जगताप (चिंचवड, पुणे),:** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कुस्तीगिरांना दिल्या जाणाऱ्या मानधनात तिप्पट वाढ करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील जागतिक स्पर्धा खेळणाऱ्या कुस्तीपटूंचे मानधन रु.२०,०००/-, हिंद केसरी, महाराष्ट्र केसरी, रुस्तम ऐ हिंद कुस्तीपटूंना रु.१५,०००/- तर अर्जुन पुरस्कार प्राप्त कुस्तीपटूंना रु.२०,०००/- मानधन देण्याचा यामध्ये समावेश करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वयोवृध्द खेळाडूंच्या मानधनातही वाढ करून ते रु.७,५००/- करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, खेळांडूच्या राखीव कोट्यातून राज्यातील वर्ग-१ च्या पदावर त्यांची निवड करण्यात येणार आहे, तसेच महिला कुस्तीपटूंच्या बाबतीतही व अर्जुन पुरस्कार प्राप्त खेळाडूंच्या बाबतीत हे धोरण राज्य सरकार राबविणार आहे काय,
(५) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने उक्त कुस्तीगिरांना मानधन वाढ करण्यासह खेळाडूंच्या राखीव कोटयातून वर्ग-१ च्या पदावर निवड करुन त्यांना इतर सोई - सुविधा उपल्बध करुन देण्याबाबत शासनाकडून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (१३-०९-२०२३) :** (१),(२) व (३) हे खरे नाही.

जागतिक स्पर्धा खेळणाऱ्या वयोवृध्द कुस्तीपटूंचे,हिंद केसरी,महाराष्ट्र केसरी, रुस्तम ऐ हिंद कुस्तीपटू व अर्जुन पुरस्कार प्राप्त खेळाडूंच्या मानधनात वाढ करण्याच्या प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे.
(४) खेळाडूंसाठी शासन सेवेत ५% आरक्षण आहे. शासन निर्णय दि.९.१२.२०१०, दि.२१.५.२०११ व दि.१०.४.२०१३ अन्वये ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा, एशियन गेम्स, कॉमनवेल्थ गेम्स, जागतीक क्रीडा स्पर्धेत पदक प्राप्त झाल्यास वर्ग-१ संवर्गात थेट नियुक्ती देण्याची तरतूद आहे. अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना थेट नियुक्ती देण्याबाबतचे सुधारित धोरण तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळा बांधा वापरा व हस्तांतरित करा या तत्वावर चालविण्याबाबत**

**(२४) ५७१८१ (२७-०४-२०२३). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या ज्या शाळा सक्षमतेने चालत नाही तसेच ज्या ठिकाणी नवीन शाळांची गरज आहे अशा सर्व शाळा या बांधा वापरा व हस्तांतरित करा या तत्त्वावर चालविण्या बाबतचा निर्णय पालकमंत्री सोलापूर यांनी दिनांक १३ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास घेतला खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाची अंमलबजावणी केव्हा पासून करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, उक्त जिल्ह्यातील कोणकोणत्या शाळांचा समावेश यामध्ये करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१३-०९-२०२३) :** (१) होय,

(२) व (३) सोलापूर जिल्ह्यातील सक्षमतेने न चालणाऱ्या बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर चालविण्याचा प्रस्ताव शासनास अद्यापही अप्राप्त आहे. सबब, उक्त परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर यांसदर्भात प्रचलित कार्यपद्धतीनुसार कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासनाच्या ग्राम विकास विभागाने ३४ जिल्ह्यांपैकी २९ जिल्ह्यांत "पंतप्रधान ग्राम सडक योजना" व "मुख्यमंत्री ग्राम सडक योजने" अंतर्गत केलेल्या रस्त्यांच्या कामांबाबत**

**(२५) ५८००८ (२५-०४-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या ग्राम विकास विभागाने ३४ जिल्ह्यांपैकी २९ जिल्ह्यांत ' पंतप्रधान ग्राम सडक योजना' व `मुख्यमंत्री ग्राम सडक योजने' अंतर्गत सुमारे १ हजार २४३ रस्त्यांच्या केलेल्या विकास कामांबाबत माहे मार्च, २०२० ते फेब्रुवारी २०२१ या कालावधीतील अभिलेख्यांची माहिती भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी मागवली असल्याची बाब दिनांक ३१ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास अनुपालन अहवालामधून निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त `पंतप्रधान ग्राम सडक योजना' व `मुख्यमंत्री ग्राम सडक योजने अंतर्गत रस्त्याची विकास कामे कोणत्या जिल्ह्यात करण्यात आली व त्याचा तपशील काय आहे,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१३-०९-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.

(२) राज्यातील ३४ जिल्ह्यांमध्ये ग्रामीण भागातील दुरावस्था झालेल्या रस्त्यांची दर्जोन्नती करण्यासाठी पंतप्रधान ग्राम सडक योजना व मुख्यमंत्री ग्राम सडक योजना राबविण्यात येत आहे.

(३) व (४) प्रश्नच उद्भवत नाही.

---

**ग्रामसेवकांच्या मानधनात वाढ करणेबाबत**

**(२६) ५८०६९ (२४-०४-२०२३). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा. मुंबई उच्च न्यायाल्याच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक ३० जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास दिलेल्या निर्णयामध्ये ग्रामसेवकांच्या मानधन / निश्चित वेतनामध्ये किमान वेतनाच्या दराप्रमाणे सुधारणा करण्यात यावी असे निर्देशित केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.न्यायालयाने निर्देशित केल्या प्रमाणे ग्रामसेवकांना किमान वेतन दर अदा करण्याबाबत शासन विचाराधीन आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (११-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) कंत्राटी ग्रामसेवकांच्या सध्याच्या रु.६०००/- एवढ्या मानधनात वाढ करुन रु.१६,०००/- एवढे मानधन देण्यावर प्रस्ताव मा.मंत्रीमंडळाच्या दि. १३ ०६.२०२३ रोजीच्या बैठकीत मांडण्यात आला होता. त्यास मा.मंत्रीमंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार या विभागाच्या दि. १८ जुलै, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये कंत्राटी ग्रामसेवकांना प्रतिमहा रु. १६,०००/- एवढे मानधन देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंचायत समिती कार्यालय, दर्यापूर (जि.अमरावती) येथील नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत**

**(२७) ५८४३९ (०३-०५-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दर्यापूर (जि.अमरावती) येथील ब्रिटिशकालीन पंचायत समिती कार्यालय इमारत जुनी व धोकादायक झाली असल्याने इमारतीचा काही भाग कोसळून जीवित तसेच वित्तहानी होण्याची शक्यता असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारत बांधकामाचा अंदाजपत्रकासह परिपूर्ण प्रस्ताव सन २०२१ मध्ये शासनास सादर करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तदनुसार सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१३-०९-२०२३) :** (१), (२) व (३) होय,

पंचायत समिती दर्यापूर, (जि. अमरावती) येथील नविन पंचायत समितीच्या इमारतीच्या बांधकामाचा परिपूर्ण प्रस्ताव शासनास प्राप्त असून निधी, निकष, प्राथम्य क्रम व प्रचलित कार्यपद्धतीनुसार कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भाटुंबा, (ता. केज, जि. बीड). येथील भ्रष्टाचार प्रकरणी नियुक्त चौकशी समिती तक्रारीत नमूद कालावधीतील चौकशी करत नसल्याबाबत**

**(२८) ५८५६१ (०९-०५-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भाटूंबा (ता. केज, जि. बीड) येथील सन - २०१२- २०१७ या कालावधीतील ग्रामपंचायतच्या पदाधिकारी यांनी

त्यावेळी ग्रामपंचायत हद्दीतील विविध कामांतील भ्रष्टाचाराबाबत ०३ सदस्यीय चौकशी समिती नियुक्त करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नियुक्त चौकशी समितीतील अधिकारी तक्रारीतील सन- २०१२ ते २०१७ कालावधीतील व समिती नियुक्त आदेशामधील मुद्द्यावर चौकशी करण्याऐवजी सन- २०१७ ते २०२२ ची चौकशी करत आहेत. त्यामुळे तक्रारीत नमूद सन - २०१२ ते २०१७ या कालावधीतील व चौकशी समिती नियुक्तीच्या आदेशामधील मुद्यांवर चौकशी करणेबाबतची मागणी श्री, सुनील धपाटे, यांनी मुख्यकार्यकारी अधिकारी, जि.प. बीड. यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तक्रारदार श्री, सुनील धपाटे यांच्या तक्रारीत नमूद कालावधीची व चौकशी समिती नियुक्तीच्या आदेशामधील मुद्यांवर चौकशी करणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी राज्याचे ग्रामविकास मंत्री व मुख्यकार्यकारीअधिकारी, जिल्हा परिषदबीड. यांचेकडे दिनांक १९/०१/२०२३ रोजी वा त्या सुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१३-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय हे अंशत: खरे आहे.

श्री. सुनिल शिवकिरण धपोटे यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी दि. १२.११.२०२२ रोजीच्या आदेशान्वये त्रिसदस्यीय समिती गठीत करून मौजे भाटुंबा, ता. केज येथील भ्रष्टाचाराची सन २०१२ ते २०१७ पर्यंतची फेरचौकशी करणेबाबत आदेश दिले होते. त्यानंतर मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल रिट याचिका क्र. ११४१०/२०२२ च्या अनुषंगाने सन २०१७ ते २०२२ या कालावधीची चौकशी करणे क्रमप्राप्त असल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद,बीड यांनी दि. ०३.०१.२०२३ पत्रान्वये या प्रयोजनार्थ अस्तित्वात असलेल्या त्रिसदस्यीय चौकशी समितीस सन २०१७ ते २०२२ या कालावधीची चौकशी करणेबाबत आदेश दिले.

(३) होय, हे खरे आहे.

(४) संबंधित चौकशी समितीच्या दि. १८.०५.२०२३ रोजीच्या चौकशी अहवालामध्ये त्रुटी आढळून आल्यामुळे व स्वयंस्पष्ट अभिप्राय नमूद नसल्याने सदर अहवाल सुधारीत करून सात दिवसाचे आत सुधारीत चौकशी अहवाल सादर करणेबाबत चौकशी समितीस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी दि. १२.०७.२०२३ च्या पत्रान्वये कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती जिल्ह्यातील तीर्थक्षेत्रांना निधी व जमिन उपलब्ध करून देण्याबाबत

**(२९) ५९०५१ (०२-०५-२०२३). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील तीर्थक्षेत्रांना निधी व जमिन उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रस्ताव ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांनी श्री अभिजीत तेलवेकर यांना दिनांक २७/१२/२०२२ रोजी पत्र क्रमांक ७९४२/२०२२ रोजी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी पाठविला असून त्या प्रस्तावामध्ये श्रीक्षेत्र ऋणमोचन श्रीशेत्र कोंडेश्वर, सूर्यवंशी वाल्मिकी मठ संस्थान सामदा काशीपूर तालुका दर्यापूर, अंबादेवी संस्थान अमरावती, रुक्मिणी माता पीठ कौंडण्यपुर, भोगेश्वर संस्थान सासन रामापुर तालुका दर्यापूर, या संस्थांना निधी मिळणे बाबतचा मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाच्या अनुषंगाने दुसऱ्या पत्रान्वये २५१५ योजनेअंतर्गत सासन रामापुर या गावांना मूलभूत सुविधा निधी मिळण्यासाठी प्रस्ताव राज्य सरकार ग्रामविकास मंत्रालयाला प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तदृअनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०६-०९-२०२३) :** (१) हे खरे नाही. सदर पत्र हे निधी मागणीचे नसून हिवाळी अधिवेशन-२०२२ मधील उपस्थित विधानसभा लक्षवेधी सुचना क्रं. १२४२ बाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी शासनास सादर केलेला अहवाल आहे. तथापि, श्री क्षेत्र ऋणमोचन या तीर्थक्षेत्राच्या रू.१०.१६कोटी इतक्या रक्कमेच्या विकास आराखडयास दि.१४/०२/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली असून रू.०६.१० कोटी निधी जिल्हाधिकारी, अमरावती यांना वितरीत करण्यात आला आहे. तसेच, श्री क्षेत्र कोंडेश्वर या तीर्थक्षेत्राच्या रू.२४.७२ कोटी इतक्या रक्कमेच्या विकास आराखडयास दि.१४/०२/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली असून रू.०४.९५ कोटी निधी जिल्हाधिकारी, अमरावती यांना वितरीत करण्यात आला आहे. श्री सुर्यवंशी मठ संस्थान सामदा काशीपुर ता. दर्यापुर या तीर्थक्षेत्रास दि.१०/११/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये ब-वर्ग दर्जा प्रदान करण्यात आला आहे. सदर तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी करावयाच्या विकास कामांची चालू दरसुचीनुसार अंदाजपत्रके व निधी प्रस्ताव शासनास अप्राप्त आहे. जिल्हास्तरावरून प्राप्त माहितीनुसार अंबादेवी संस्थान हे तीर्थक्षेत्र नगरपालिका हद्दीत असून रूख्मिणी माता पीठ, कौंडण्यपुर या तीर्थक्षेत्रांस ब-वर्ग दर्जा प्राप्त असून भोगेश्वर संस्थान सासन रामापुर ता. दर्यापुर या तीर्थस्थळांस ब-वर्ग दर्जा प्राप्त नाही.
(२) व (३) होय, हे खरे आहे. सासन रामापुर या गावाला मुलभुत सुविधा मिळण्यासाठी निवेदन शासनास प्राप्त झाले असून शासन निकष व निधी उपलब्धतेनुसार पुढील कार्यवाही शक्य आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवदुर्गा संस्थान टाकळी गीलबा (ता.नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती) तीर्थक्षेत्र "क" वर्ग तीर्थक्षेत्र घोषित करण्याबाबत

**(३०) ५९०६३ (०२-०५-२०२३). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी यांच्या शिफारशीनुसार जिल्हा परिषद कार्यकारी अभियंता विभागाचे उपकार्यकारी अभियंता जिल्हा परिषद बांधकाम विभाग अमरावती यांचे पत्र क्रमांक तीर्थक्षेत्र ७५००/२०२२ दिनांक ०७-१२-२०२२ पत्रान्वये जिल्हा पोलीस अधीक्षक ग्रामीण कार्यालय अमरावती या ठिकाणी पत्र पाठवून नवदुर्गा संस्थान नवदुर्गा संस्थान टाकळी गीलबा (ता. नांदगाव खंडेश्वर जि.अमरावती) तीर्थक्षेत्र "क" वर्ग तीर्थक्षेत्र घोषित करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास सदर प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयात प्राप्त झाला आहे किंवा कसे तसेच १८ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास जिल्हा समितीच्या सभेमध्ये मान्यता देण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रस्तावाची नोंद कशी घेण्यात आली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०६-०९-२०२३) :** (१) होय, खरे आहे.
(२) व (३) नाही. जिल्हा पोलीस अधीक्षक (ग्रामीण) यांचेकडून प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर वनविभागाचे प्रमाणपत्र व शासन निर्णयानुसार आवश्यक बाबींची पूर्तता करण्याची कार्यवाही गटविकास अधिकारी, पंचायत समिती नांदगाव खंडेश्वर यांच्या मार्फत करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ग्रामीण भागातील रस्ते तालुक्याला जोडले जावे याकरिता मुख्यमंत्री ग्रामसडक योजना राबविण्यात येत असल्याबाबत**

**(३१) ५९०८३ (२७-०४-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागातील रस्ते तालुक्याला जोडले जावे याकरिता मुख्यमंत्री ग्रामसडक योजना राबविण्यात येत असून वाडा तालुक्यातील मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतील अनेक कामे प्रलंबित असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदर कामे तातडीने पूर्ण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१३-०९-२०२३) :** (१) व (२) मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत एकूण १३ कामे माहे जानेवारी,२०२३ पर्यंत व १ काम एप्रिल, २०२३ पुर्ण झालेली आहेत. सद्यस्थितीत १ काम न्यायप्रविष्ट असल्याने प्रलंबित आहे.

(३) प्रश्नच उद्भवत नाही.

---

**भोर व वेल्हे तालुक्यातील ( जि.पुणे) देवस्थानांना ‘क’ वर्ग देवस्थान विकास आराखडयामध्ये समावेश करण्याबाबत**

**(३२) ५९१७१ (३०-०४-२०२३). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोर व वेल्हे तालुक्यातील (जि.पुणे) येथील भोरेश्वर देवस्थान,काळुबाई देवी देवस्थान,अमृतेश्वर देवस्थान,राजेश्वर देवस्थान,मळाई देवी, धानेश्वर देवस्थान या ’क’ वर्ग देवस्थानांना सन २०२२-२३ विकास आराखडयामध्ये समावेश करुन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत मा.उच्च व तंत्रशिक्षण मंत्री तथा पालक मंत्री पुणे जिल्हा यांना दिनांक २० डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदर निवेदनावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०६-०९-२०२३) :** (१) अंशतः खरे आहे.

(२) काळूबाई देवी, कांजळे या तीर्थक्षेत्रास क-वर्ग दर्जा घोषित करून सन २०२२-२३ मध्ये रु.१०.००लक्ष निधी रस्त्याच्या कामासाठी मंजूर करण्यात आलेला आहे. तसेच, मळाईदेवी, वांगणी या तीर्थक्षेत्रास दि.२७.०१.२०२३ रोजी क-वर्ग दर्जा प्राप्त आहे. भोरेश्वर देवस्थान, भोर हे तीर्थक्षेत्र भोर नगरपालिका हद्दीत असून जिल्हा परिषदेच्या कार्यक्षेत्रात येत नाही. अमृतेश्वर देवस्थान, मोहरी बु. या तीर्थक्षेत्रास क-वर्ग दर्जा मिळण्याबाबत प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे सादर केलेला आहे. धानेश्वर देवस्थान, धानेप या तीर्थक्षेत्राचा प्रस्ताव पोलीस अधिक्षक (ग्रामीण), पुणे यांच्याकडे दि.०९.०१.२०२३ रोजी भाविकांच्या उपस्थिती बाबतचा दाखला मिळण्यासाठी प्राप्त झालेला आहे. राजेश्वर देवस्थान, रांजे ता. भोर येथील प्रस्ताव अप्राप्त आहे. शासन निर्णयानुसार उपरोक्त तीर्थक्षेत्राचे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर जिल्हा नियोजन समितीकडे क-वर्ग दर्जा व निधी उपलब्ध करून देणे शक्य आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ग्रामविकास विभागाने परिपत्रकाद्वारे गडचिरोली जिल्हयात जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(३३) ५९३९० (०२-०५-२०२३). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद गडचिरोली येथील आरोग्य विभागातील आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, औषध निर्माता व आरोग्य पर्यवेक्षक यांची रिक्त पदे भरण्याची परवानगी ग्रामविकास विभागाने परिपत्रकाद्वारे माहे ऑक्टोंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त परिपत्रकानुसार रिक्त पदे भरण्याची कार्यवाही माहे जानेवारी २०२३ मध्ये वा त्यादरम्यान करणे अपेक्षीत असतांना जिल्हा परिषद प्रशासनाने कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदरहू रिक्त पदे तातडीने भरणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०६-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) (३) व (४) जिल्हा परिषद अंतर्गत गट-क संवर्गातील आरोग्य विभागाशी संबंधित व इतर संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरिता ग्रामविकास विभागाच्या दि.२१ ऑक्टोबर, २०२२ व दि.१५ नोव्हेंबर, २०२२ च्या शासन निर्णयान्वये कार्यवाही करण्यात येत आहे. दरम्यान काही मा.लोकप्रतिनिधींकडून करण्यात आलेल्या मागणीच्या अनुषंगाने दि.१६ मार्च, २०२३ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून, मार्च २०१९ मधील जाहिरातींकरीता अर्ज केलेले उमेदवार वयाधिक्य झाल्याने अपात्र होत असल्याने त्यांचे नुकसान होऊ नये करीता अशा उमेदवारांना दि.३१ डिसेंबर, २०२३ पर्यंत जिल्हा परिषद सरळसेवा परीक्षांकरीता प्रसिध्द होणाऱ्या जाहिरातींकरीता पात्र असल्याबाबत तसेच, इतर उमेदवारांना दि.३१ डिसेंबर, २०२३ पर्यंत जिल्हा परिषद सरळसेवा परीक्षांकरीता प्रसिध्द होणाऱ्या जाहिरातींकरीता कमाल वयोमर्यादेत २ वर्षांची सुट देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे. सरळसेवा पदभरतीकरीता असलेल्या गट-क च्या संवर्गांकरीता सुधारीत प्रश्नपत्रिकेचे स्वरुप व अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने दि.९.५.२०२३ व दि.१५.५.२०२३ अन्वये शासन परिपत्रक निर्गमित करण्यात आली आहेत. तसेच, दि.१५.५.२०२३ रोजीच्या परिपत्रकान्वये भरती प्रक्रिया राबवितांना सर्व जिल्हा परिषदांमध्ये एकसूत्रता असावी याकरीता मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. राज्यातील सर्व जिल्हा परिषदांकडून दि.५ ऑगस्ट, २०२३ रोजी गट-क संवर्गातील सरळसेवा पदभरतीबाबत जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्यानुसार गट-क मधील ३० संवर्गातील एकूण १९,४६० पदे भरण्यात येणार आहेत.

---

## मौजे गजवडी (ता,जि.सातारा) येथे जुनी स्मशानभूमी असून त्याठिकाणी नवीन स्मशानभूमी बांधून देण्याबाबत

**(३४) ५९३९१ (२५-०४-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गजवडी (ता.जि.सातारा) येथे गेल्या ५० वर्षापासून जुनी स्मशानभूमी असून त्याठिकाणी नवीन स्मशानभूमी बांधून देण्यासाठी शासनाने माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान प्रशासकीय मान्यता दिली असून अद्यापही कामास सुरुवात झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त काम सुरु न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तदअनुषंगाने उक्त स्मशानभूमीचे काम त्वरीत सुरु करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०६-०९-२०२३) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे. जिल्हा वार्षिक योजना सन २०२२-२३ मधून जनसुविधा अंतर्गत ग्रामपंचायत गजवडी येथे स्मशानभूमी शेड बांधणे या कामास प्रशासकीय मान्यता दिली आहे. मौजे गजवडी, ता. जि. सातारा येथील जुनी स्मशानभुमी ही गजवडी ग्रामपंचायतीच्या हद्दीत सातारा-ठोसेघर रस्त्यावर उरमोडी नदीवरील पुलाच्या लगत दक्षिणेस नदी पात्रात खुल्या स्वरुपात आहे. सदर खुल्या जागेची नोंद ग्रामपंचायत गजवडी यांचे नावे नाही. त्यामुळे सदर ठिकाणी स्मशानभुमीचे बांधकाम करता येत नाही. ग्रामपंचायत गजवडी यांचेद्वारे स्मशानभुमी करीता जागा घेणेची कार्यवाही सुरु झालेली आहे. ग्रामपंचायतीस स्मशानभूमी करीता तुर्तास जागा उपलब्ध होत नसल्याने सदरचे काम रद्द करणेबाबत ग्रामपंचायत गजवडी यांनी विषय क्र.१० ठराव क्र १०(२२) दिनांक २०.६.२०२३ अन्वये कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**साबळेवाडी (ता. खेड, जि.पुणे) येथील श्री आंबिका देवस्थानाला क वर्गाचा दर्जा मिळण्याबाबत**

**(३५) ५९४६९ (०२-०५-२०२३). श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे साबळेवाडी (ता. खेड, जि.पुणे) येथील श्री आंबिका देवस्थानाला क वर्गाचा दर्जा मिळण्याबाबत संबंधित ट्रस्टमार्फत जिल्हा परिषद यांना प्राप्त झालेला प्रस्ताव अपूर्ण असून कागदपत्रांची पुर्तता करण्यात येत असल्याचे शासनाने तारांकित प्रश्नाच्या उत्तरात नमूद केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील देवस्थानाने योग्य त्या कागदपत्रांची पुर्तता करून मा.मुख्य कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद पुणे यांच्याकडे परिपूर्ण प्रस्ताव दिनांक. ९.१.२०२३ रोजी वा त्यासुमारास सादर केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील देवस्थानाच्या प्राप्त प्रस्तावावर शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) असल्यास, श्री आंबिका देवस्थान तीर्थक्षेत्रास तातडीने क वर्ग दर्जा देण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०६-०९-२०२३) :** (१) व (२) होय, खरे आहे.
(३) व (४) जिल्हा परिषद, पुणे यांच्याकडून त्रुटींची पूर्तता करून श्री अंबिका देवस्थानचा परिपूर्ण प्रस्ताव दि. २२ जून, २०२३ रोजी जिल्हा नियोजन समितीकडे "क" दर्जा देण्यासाठी सादर केलेला आहे. या प्रस्तावावर जिल्हा नियोजन समिती मार्फत अंतिम निर्णय घेण्यात येणार आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील जिल्हा परिषदेकडील सन २००५ ते २०१८ मधील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची १०% पदे भरतीकरून घेण्याबाबत**

**(३६) ५९६५५ (०३-०५-२०२३). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील जिल्हा परिषदेकडील सन २००५ ते २०१८ मधील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची १०% पदे भरतीकरून घेण्याबाबतचा निर्णय राज्य शासनाने घेतल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान घेतल्याचे निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्याकडून विविध प्रकारच्या मागण्या करण्यात आल्या असून त्यात ग्रामपंचायत कर्मचाऱ्यां मधून १० टक्के पदे हे जिल्हा परिषद सेवेत भरती करण्यात येत आहेत हे माहे जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरेआहे काय,

(३) असल्यास, याबाबत जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्या स्तरावर रिक्त असणारी पदे भरण्याबाबची अनुशेष दिनांक २४/०८/२०२२ रोजीच्या पत्रान्वये राज्यशासनास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागण्यासाठी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांकडून पत्रव्यवहार व आंदोलने करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना जिल्हा परिषद सेवेत भरती करण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०६-०९-२०२३) :**(१) ग्रामविकास विभागाच्या दि.१३.१०.२०२२ रोजीच्या पत्रानुसार जिल्हा परिषद, कोल्हापूर कडील वर्ग-३ ची ३८ पदे ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांमधून भरण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(२), (३) व (४) हे खरे आहे.

(५) जिल्हा परिषद, कोल्हापूर कडील कंत्राटी ग्रामसेवक- १५, आरोग्य सहायक- १०, पशुधन पर्यवेक्षक- २ व स्थापत्य अभियांत्रिकी- ३ अशा ३० ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना ज्येष्ठता यादीनुसार जिल्हा परिषद सेवेत दि.२१.१२.२०२२ च्या आदेशाने पदस्थापना देण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील ग्रामपंचायतीत संगणक उपलब्ध करणेबाबत**

**(३७) ६१९२७ (०३-०५-२०२३). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एकूण २७८३२ ग्रामपंचायती असून त्यापैकी २६ हजार ९२३ ग्रामपंचायतींमध्ये संगणक सुविधा उपलब्ध असल्याचे माहे डिसेंबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील जवळपास १ हजार ग्रामपंचायतींमध्ये अद्यापही संगणक नसल्याचे निदर्शनास आले आहे ,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त ग्रामपंचायतींमध्ये कधीपर्यंत संगणक उपलब्ध करण्यात येतील याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२६-०९-२०२३) :** (१) व (२) राज्यातील एकूण २७८६३ ग्रामपंचायतींपैकी २७८३९ ग्रामपंचायतींत आपले सरकार सेवा केंद्र प्रकल्पाच्या माध्यमातून ग्रामपंचायतींचे संगणकीकरण व संपूर्ण डिजीटल सेवा नागरिकांना पुरविल्या जात आहेत. उर्वरित २४ ग्रामपंचायतींमध्ये आपले सरकार सेवा केंद्र स्थापन करणे व त्यानुषंगाने संगणकीकरणासाठी कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कडूस (ता.खेड) गावातील कुमंडला नदीवरील पुलाच्या परिसरात पसरलेल्या अस्वच्छतेबाबत

**(३८) ६२१६० (०२-०५-२०२३). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री. पांडुरंगाचे वास्तव्य लाभलेल्या प्रतिपंढरी म्हणून ओळख असलेल्या कडूस (ता.खेड) गावातील कुमंडला नदीवरील पुलाच्या परिसरात घाणीमुळे दुर्गंधी पसरल्याने नियमित ये-जा करणाऱ्या नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कुमंडला नदीवरील पुलाचा परिसर स्वच्छ होण्यास सुमारे किती कालावधी लागेल,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्नुसार कुमंडला नदीवरील पुलाचा परिसर स्वच्छ करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१३-०९-२०२३) :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी येत्या १ महिन्यात ग्रामपंचायत, कडुस यांच्या मालकीच्या २ घंटा गाड्या मार्फत तेथील कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

स्वच्छ भारत मिशन योजने अंतर्गत गोबरधन प्रकल्पाचे काम पूर्ण झाले असून त्यात सर्व ओल्या कचऱ्याची विल्हेवाट करण्यात येईल.सर्व परिसर ग्रामपंचायतीने स्वच्छ ठेवण्याचे मान्य केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बीड जिल्हा क्रीडा कार्यालयासह अंबाजोगाई तालुका क्रीडा कार्यालयातील रिक्त पदे भरणेबाबत

**(३९) ६२९१९ (२७-०४-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हा क्रीडा कार्यालयासाठी एकूण १३ पदे मंजूर असून त्यापैकी जिल्हा क्रीडा अधिकारी, दोन तालुका क्रीडा अधिकारी व एक लिपिक कार्यरत असून ०९ पदे रिक्त आहेत. त्यामुळे ११ तालुक्यांचा कारभार दोन तालुका क्रीडा अधिकारी पाहत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंबाजोगाई येथील क्रीडा संकुल येथे क्रीडा मार्गदर्शकासह लिपिक व शिपाई ही पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रिक्त पदांमुळे शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी होणे कठीण झाले असून खेळाडूंचे मोठे नुकसान होत आहे. त्यामुळे उक्त रिक्त पदे भरण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी क्रीडा मंत्री यांचेकडे दिनांक ०९/०२/२०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने उक्त रिक्त पदे भरण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (१३-०९-२०२३) :** (१) व (२) खरे आहे.

(३) व (४) बीड जिल्हयातील रिक्त पदांचा अतिरीक्त कार्यभार इतर अधिकारी / कर्मचारी यांना देण्यात आला आहे. त्यामुळे रिक्त पदांमुळे शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी व्यवस्थित होत असून खेळाडूंचे नुकसान होत नाही आहे. क्रीडा विभागातील कनिष्ठ लिपीक संवर्गातील २७ पदे सरळसेवेने भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत जाहिरात दि.२० जानेवारी, २०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच क्रीडा व युवक संचालनालयस्तरावरुन ५९- क्रीडा अधिकारी, ५०- क्रीडा मार्गदर्शक, ०१- निम्नश्रेणी लघुलेखक व ०१ शिपाई असे एकूण १११ पदे भरण्याबाबत दि. १९.७.२०२३ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर प्रमाणे पदभरती झाल्यानंतर बीड जिल्हयातील पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विदर्भाचे पंढरपूर व रुक्मिणीचे माहेर घर असलेल्या कौंडण्यपुर तिर्थाक्षेत्रालगत वर्धा आर्वी तालुक्यातील गावांना सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४०) ६२९४६ (०२-०५-२०२३). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भाचे पंढरपूर व रुक्मिणीचे माहेर घर असलेल्या कौंडण्यपुर तिर्थक्षेत्रालगत वर्धा नदीकिनारी आर्वी तालुक्यातील देऊरवाडा गांव वसलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देऊरवाडा येथे वर्धा नदी किनारी अनेक जिल्ह्यातील नागरिक दशक्रिये करिता येतात परंतु सदर गावात नदी पात्रात दशक्रियेच्या विधीसाठी कोणतीही सुविधा नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लहानुजी महाराजांचे तिर्थक्षेत्र असलेले टाकरखेडा गावालगत वर्धा नदी पर्यत भक्त दररोज महाराजांची पालखी घेवून जातात परंतू त्या ठिकाणच्या नदी किनारी कोणत्याही सोयी - सुविधा नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नांदपुर, (ता. आर्वी) येथील बाकळी किनाऱ्यावर आर्वी शहरातील गणपती विसर्जन व दुर्गा मातेचे विसर्जन केले जातअसून याठिकाणीही कोणतीही सोयी -सुविधा नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उकत प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदर तीनही नदी पात्रात उतरण्यासाठी पायऱ्यांचे बांधकाम, घाट बांधकाम व सौदर्यीकरणा करिता निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०६-०९-२०२३) :** (१) होय, खरे आहे.

(२) होय, खरे आहे.

(३) अंशतः खरे आहे. जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत ‘क’ वर्ग तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रम सन २०२२-२३ मध्ये संत लहानुजी महाराज देवस्थान येथे सौंदर्यीकरण करण्याकरिता रु.१०.००लक्ष निधी मंजूर केला आहे.

(४) होय, खरे आहे.

(५) देऊरवाडा व नांदपुर, ता. आर्वी जि.वर्धा येथील तीर्थक्षेत्रांना ‘क’ वर्ग दर्जा प्राप्त नाही. तसेच संत लहानूजी महाराज संस्थान, टाकरखेडा ता. आर्वी या तीर्थक्षेत्रास दि.२३/०३/२०२३ रोजी ब-वर्ग दर्जा प्रदान केला आहे. तथापि, या तीर्थक्षेत्राचा निधी मंजुरीचा प्रस्ताव शासनास अद्याप प्राप्त झालेला नाही. शासनाने यासंदर्भात उचित कार्यवाही करण्यासाठी दि.१३/०७/२०२३ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा परिषद, वर्धा यांना कळविले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासनाच्या बाळासाहेब ठाकरे मातोश्री ग्रामपंचायत योजनेअंतर्गत राज्यभरात ग्रामपंचायत कार्यालय इमारतीचे बांधकाम प्रलंबित असल्याबाबत**

**(४१) ६३०५० (०३-०५-२०२३). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या बाळासाहेब ठाकरे मातोश्री ग्रामपंचायत योजनेअंतर्गत राज्यभरात ग्रामपंचायत कार्यालय उभारणीकरिता मान्यता देण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,उक्त योजनेअंतर्गत सांगली जिल्हयातील खानापूर व आटपाडी तालुक्यातील ग्रामपंचायती कार्यालयाच्या इमारतीचे बांधकाम प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरची कामे अपूर्ण राहण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास,उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले त्यानुषंगाने सदरहू कामे तातडीने पूर्ण करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१३-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे,
(२), (३) व (४) ग्राम विकास विभागाच्या दिनाक ३१ मार्च, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये, स्व. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेंतर्गत सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातील ५ ग्रामपंचायती व आटपाडी तालुक्यातील २ ग्रामपंचायतींच्या इमारत बांधकामांना मंजुरी देण्यात आलेली असून जिल्हा परिषदेच्या निधी मागणीनुसार निधी वितरीत केला जातो.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नंदुरबार जिल्ह्यातील नवापूर तालुक्यामधील प्रजिमा-२८ ते उपसिंचन वाघशेपा रस्ता कि.मी.०/०० ते २/०० ची सुधारणा करण्याबाबत**

**(४२) ६३१२५ (१०-०५-२०२३). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परषिद, नंदुरबार यांनी नवापूर तालुक्यातील प्रजिमा-२८ ते उपसिंचन वाघशेपा रस्ता कि.मी.०/०० ते २/०० ची सुधारणा करणे बाबतचा कार्यारंभ आदेश इंजिनीअर कन्हैया कैलास गावित रा. खैरवे (ता. नवापूर) यांस दिनांक २८/०७/२०२१ अन्वये दिले असून देखील तद्नंतर याच कामाचा कार्यारंभ आदेश इंजिनीअर उदित अशोक नाईक रा.नवागांव (ता. नवापूर) यांना दिनांक २४/०१/२०२२ अन्वये दिलेला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त एकाच कामाचा कार्यारंभ आदेश दोन व्यक्तींना देण्याचे प्रयोजन काय आहे,
(३) असल्यास, कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परषिद, नंदुरबार यांनी दिलेला सदर कामाचा कार्यारंभ आदेश उपरोक्त नमूद एजन्सीपैकी कोणासाठी नेमका ग्राह्य धरण्यात यावा, तसेच सदरचे काम नेमके कोणत्या एजन्सीने केली आहे तसेच सदर कामाचे बिल अदा करण्यात आले असल्यास ते कोणत्या एजन्सीला देण्यात आले,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०८-०९-२०२३) :** (१), (२) व (३) जिल्हा परिषदेने प्रजिमा-२८ ते उपसासिंचन वाघशेपा रस्ता कि.मी.०/०० ते २/०० ची सुधारणा करणे या कामाचा कार्यारंभ आदेश प्रथम इंजि. कन्हैया कैलास गावित (रा.खैरवे, ता.नवापूर) यांना दि. २८.०७.२०२१ रोजी दिला आहे. तद्नंतर नजरचुकीने सदर कामाचा कार्यारंभ आदेश कामवाटप सभेच्या मंजुरीनुसार इंजि. उदित अशोक नाईक (रा.नवागांव, ता. नवापूर) यांना दि.२४.०१.२०२२ रोजी दिला आहे. तथापि प्रत्यक्षात दोन्ही कामे वेगवेगळया साखळी क्रमांकात करण्यात आली असल्याचे जिल्हा परिषदेने कळविले आहे.

मात्र इजि. कन्हैया गावित यांना देयक अदा करण्यात आलेले असून, इंजि.उदित नाईक यांना अद्याप देयक अदा केलेले नाही.
(४) प्रस्तुत प्रकरणी उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक यांचेमार्फत सखोल चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. उपायुक्त (विकास) यांचा चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार पुढील कारवाई करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी जिल्ह्यातील गंगाखेड मतदार संघातील अतिवृष्टी / पुरहाणीमुळे वाहून गेलेले पुल व रस्त्याच्या दुरावस्थेबाबत**

**(४३) ६३१७९ (०२-०५-२०२३). श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील गंगाखेड, पालम व पुर्णा तालुक्यातील बहुतांश रस्ते व पुल अतिवृष्टी/पुरहाणीमुळे वाहून गेल्याने दळणवळणाचा गंभीर प्रश्न निर्माण झाल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधीत अधिकाऱ्यांनी सदरील रस्ते व पुलाची पाहणी करून शासनास अहवालही सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अतिवृष्टीने नुकसान झालेल्या रस्ते व पुल दुरुस्तीकरीता शासनाने तात्काळ निधी देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (गंगाखेड) यांनी मुख्यअभियंता, सा.बां.विभाग औरंगाबाद, अधिक्षक अभियंता, सा.बां.मंडळ नांदेड, सचिव रस्ते, सार्वजनिक बांधकाम मंत्री, मा.मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, ग्रामविकास मंत्री, यांना दिनांक १५.०९.२०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदर मागणीनुसार नुकसानग्रस्त झालेले रस्ते व पुल दुरुस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०६-०९-२०२३) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) परभणी जिल्ह्यातील गंगाखेड, पालम व पूर्णा तालुक्यातील रस्त्यांच्या दुरुस्तीकरीता ग्रामीण रस्ते विकास व मजबुतीकरण (लेखाशिर्ष ३०५४-१५३९-३१) योजने अंतर्गत सन २०२१-२२ मध्ये ४० रस्त्यांची कामे मंजूर असून त्यापैकी ३८ कामे पूर्ण झालेली आहेत व सन २०२२-२३ या अर्थिक वर्षामध्ये २४ रस्त्यांची कामे मंजूर करण्यात आली असून सदर कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच यापुढेही निधीच्या उपलब्धतेनुसार ग्रामीण मार्गांची दुरुस्ती करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्रात औषधांचा पूरवठा तसेच रिक्त पदे भरण्यासह निधी उपलब्ध करणेबाबत**

**(४४) ६३६२५ (०२-०५-२०२३). ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.संजय जगताप (पुरंदर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयात प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांना आवश्यक असणारी औषधे खरेदी केली नसल्याने रुग्णांना औषधे उपलब्ध न झाल्याने गरीब रुग्णांना खाजगी मेडिकलमधून स्वखर्चाने औषधे खरेदी करावी लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रक्त वाढीच्या गोळया, मधुमेहाच्या गोळया,रक्त दाबाच्या गोळया,खोकल्याचे औषध संपलेले आहे अशा पाट्या काही प्राथमिक आरोग्य केंद्रात निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच,नेरे, भोंगवली, आंबवडे, जोगवडी, नसरापूर (ता.भोर,जि.पूणे) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये डॉक्टर, आरोग्यसेविका, स्टाफ नर्स, शिपाई व अन्य कर्मचा-यांची पदे रिक्त असल्याने रुग्ण सेवेवर विपरीत परिणाम होत असून येथे औषधांचा तुटवडा जाणवत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) तसेच, कोरोना काळापासून भोर येथिल उप जिल्हा रुग्णालयाला निधीची कमतरता निर्माण झाल्यामुळे विविध संस्थांचे २८ लाख व गेल्या तीन वर्षापासून वीज बिलाचे १० लाख अशी देणी शिल्लक असल्यामुळे रुग्णालय प्रशासन चालविणे कठिण होत आहे हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार प्राथमिक आरोग्य केंद्रात औषधांचा पूरवठा तसेच रिक्त पदे भरण्यासह भोर उप जिल्हा रुग्णालयातील प्रलंबित देणी देण्यासाठी निधी उपलब्ध करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१२-०५-२०२३) :** (१) हे खरे नाही.

जिल्हास्तरावर औषधी खरेदी करुन प्राथमिक आरोग्य केंद्रांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.
(२) पुणे जिल्हयात ९६ प्राथमिक आरोग्य केंद्र आहेत त्यापैकी फक्त प्राथमिक आरोग्य केंद्र कुंजीरवाडी, तालुका हवेली, जिल्हा पुणे येथे मधुमेहाच्या गोळया संपलेल्या आहेत अशा प्रकारची पाटी दि.१५.०२.२०२३ रोजी काही वेळासाठी लावली होती. परंतु येथे तात्काळ सदरील औषधी उपलब्ध करुन देण्यात आली, सध्या मधुमेहाच्या गोळया, रक्तदाबाच्या गोळया व खोकल्याचे औषध आवश्यक त्याप्रमाणात उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.
(३) तालुका आरोग्य अधिकारी भोर यांचेकडील प्राप्त अहवालानुसार नेरे, भोंगवली, आंबवडे, जोगवडी व नसरापूर या पाच प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सर्व संवर्गाची एकुण १३९ मंजुर पदे आहेत त्यापैकी ९३ पदे भरलेली असुन ४६ पदे रिक्त आहेत, वैदयकीय अधिकारी यांची एकुण १३ पदे मंजुर असुन सर्व पदे भरण्यात आलेली आहेत. समुदाय विकास अधिकारी यांची भरती प्रक्रीया पुर्ण झालेली आहे. तसेच नेरे, भोंगवली, आंबवडे, जोगवडी व नसरापुर या पाच प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये औषध साठयाचा आवश्यक त्या प्रमाणात पुरवठा करण्यात आलेला आहे.
(४) हे अशंत: खरे आहे.
(५) नेरे, भोंगवली, आंबवडे, जोगवडी, नसरापूर या पाच प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये एकुण १३९ मंजुर पदांपैकी ९३ पदे भरलेली आहेत. ४६ पदे रिक्त आहेत. वैदयकीय अधिकारी यांची एकुण १३ पदे मंजुर असुन ती सर्व पदे भरण्यात आलेली आहेत. समुदाय विकास अधिकारी यांची भरती प्रक्रीया पुर्ण झालेली आहे.तसेच सदर प्राथमिक आरोग्य केंद्राकरिता आवश्यक औषध पुरवठा करण्यात आलेला आहे. उपजिल्हा रुग्णालयास अनुदानाच्या उपलब्धतेनुसार निधी वितरित करण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### धुळे शहरातील सरकारी कामगार अधिकारी कार्यालयात कर्मचाऱ्यांची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत

**(४५) ६४३३० (२७-०४-२०२३). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे शहरातील कामगार कार्यालयात मंजूर पदांच्या तुलनेत फक्त ३० टक्के कर्मचारी कार्यरत असून रिक्त पदांचा कार्यभार इतर कर्मचाऱ्यांकडे सोपविण्यात आला असल्याने कामे प्रलंबित राहत असल्याचे दिनांक ११ फेब्रुवारी,२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धुळे येथील कामगार अधिकारी कार्यालयातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (१८-०७-२०२३) :** (१) सरकारी कामगार अधिकारी कार्यालय, धुळे येथे ३०% पदे कार्यरत आहेत, ही वस्तुस्थिती आहे.
(२) सरकारी कामगार अधिकारी कार्यालय, धुळे येथे दुकाने निरीक्षक, श्रेणी-२ या संवर्गात ४ तर लिपिक-टंकलेखक संवर्गात ३ पदे रिक्त आहेत. दुकाने निरीक्षक, श्रेणी-२ या संवर्गात सरळसेवा व पदोन्नती यांचे प्रमाण १:१ असे आहे. या

संवर्गातील सरळसेवा कोट्यातील पदभरतीसाठी एजन्सीसोबत करार करण्याची कार्यवाही सुरु असून पदोन्नती कोट्यात पदे रिक्त नाहीत. तसेच, लिपिक-टंकलेखक संवर्गात सरळसेवा व पदोन्नतीचे प्रमाण १:१ असे आहे. सरळसेवा कोट्यातील पदभरतीसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दि.२०.०१.२०२३ रोजी जाहिरात प्रसिद्ध केली आहे. पदोन्नती कोट्यात निम्न संवर्गात पात्र कर्मचारी उपलब्ध नसल्याने पदोन्नती कोट्यातील पदे रिक्त आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार प्राप्त कामगारांना शासनाच्या सोई-सवलती मिळण्याबाबत**

**(४६) ६६४३३ (२३-०८-२०२३). श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र शासनाच्या विविध महामंडळांच्यावतीने ज्या सामाजिक कार्यकर्त्यांना राज्यस्तरावरील पुरस्कार दिले जातात व विभागाच्यावतीने शासनाच्या विविध सोयी-सवलती त्यांना दिल्या जातात, परंतू महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार प्राप्त कामगारांना कोणत्याही सोई-सुविधा दिल्या जात नसल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार प्राप्त असलेल्या कामगारांवर अन्याय होत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंग्राने उक्त गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार प्राप्त कामगारांना शासनाच्या विविध सोयी सवलती तातडीने मिळण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (०८-०९-२०२३) :** (१) गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार प्राप्त झालेल्या कामगारांना अन्य सोई-सुविधा देण्याची मागणी करणारे दिनांक २१/०५/२०२३ रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे.
(२) व (३) महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडून कामगार कल्याण निधी भरणा-या कामगार व कर्मचा-यांना साहित्य, सामाजिक, शैक्षणिक व क्रीडा आदी क्षेत्रातील विशेष योगदानासाठी तसेच त्यांना चांगले काम करण्यासाठी प्रोत्साहीत करण्यासाठी गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार देण्यात येतो.

सन २०२० पासून सदर पुरस्काराच्या रक्कमेत रु.१५०००/- वरुन रु.२५०००/- इतकी भरीव वाढ करण्यात आली आहे.

गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार प्राप्त पुरस्कारार्थींना विशेष कार्य अधिकारी या पदावर नियुक्तीसाठी पात्र करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पाचल ( ता. राजापूर, जि. रत्नागिरी ) येथील ग्रामपंचायती अंतर्गत येत असलेल्या प्रसाधनगृहाच्या दुरावस्थेबाबत

**(४७) ६६५५२ (२३-०८-२०२३). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचल (ता. राजापूर, जि. रत्नागिरी ) येथील ग्रामपंचायती अंतर्गत येत असलेल्या सर्व प्रसाधनगृहे संकुले अतिशय अस्वच्छ व घाणेरडी झालेली असून गत वर्षभरापासून साफ केली नसल्याने समस्याचे निराकरण करण्याची मागणी स्थानिक नागरिकांसह ' समर्थन ' संस्थेने माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान मा. मुख्यमंत्री, मा. उप मुख्यमंत्री, अपर मुख्य सचिव, ग्रामविकास, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रत्नागिरी यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे तक्रारी करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदर ग्रामपंचायत हद्दीतील सर्व प्रसाधनगृहाच्या संकुलांची स्वच्छता तसेच तुटलेल्या दरवाजांच्य दुरुस्तीकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित जिल्हा परिषद अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१३-०९-२०२३) :** (१) होय हे अंशत खरे आहे.

(२) पाचल ग्रामपंचायती अंतर्गत येत असलेल्या सर्व प्रसाधन गृहापैकी आठवडा बाजार येथील सार्वजनिक स्वच्छता गृह हे अर्जुना नदी लगत असल्याने माहे ऑगस्ट-२०२२ मध्ये अतिवृष्टी मुळे पूर आल्याने पुराचे पाणी आठवडा बाजार परिसरात शिरून स्वच्छता गृहाची दुरवस्था झालेली आहे, ही वस्तुस्थिती खरी आहे. तदनंतर ग्रामपंचायतीने सदर स्वच्छता गृहाची दुरुस्ती केली आहे.सद्यस्थितीत सदरचे स्वच्छतागृह /प्रसाधनगृह सुस्थितीत असून ग्रामपंचायती अंतर्गत येणारी इतर प्रसाधन गृहे सुस्थितीत असून त्यांची साफसफाई ग्रामपंचायत कर्मचाऱ्याद्वारे नियमितपणे करण्यात येत असल्याने त्यांचा वापर ग्रामस्थ तसेच पाचल पंचक्रोशीतील येणारे, ग्राहक व व्यापारी करीत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दापोली तालुक्यातील (जि. रत्नागिरी) येथील गावांना जोडणाऱ्या रस्त्याच्या एका बाजूला खोल दरी असल्याने तेथे विनाविलंब संरक्षक कठडा बांधण्याबाबत

**(४८) ६७०६८ (२५-०८-२०२३). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली तालुक्यातील (जि रत्नागिरी) बांधतिवरे-राजापूर-दळखण-देहेण- पिचडोली- रेवली-भोमडी- डोली-वांझळोली आदी अनेक गावांना जोडणारा अत्यंत महत्वाच्या व जवळचा रस्ता असून तेथील ग्रामस्थांच्या अनेक वर्षाच्या मागणीनंतर सदरहू रस्त्याचे शासनाने रूंदीकरण केले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्याच्या बांधतिवरे येथील एरंडी वाडीजवळील रस्त्याच्या एका बाजूला खोल दरी असूनही याठिकाणी संरक्षक कठडा नसल्याने मोठया प्रमाणावर वाहतूक असलेल्या हा रस्ता अत्यंत धोकादायक झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू ठिकाणी विनाविलंब संरक्षक कठडा बांधण्यात यावा म्हणून पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी मागील सुमारे १ वर्षापासून सातत्याने कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, चिपळूण, मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री, मा. पालकमंत्री, रत्नागिरी जिल्हा आदीकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार सदर ठिकाणी संरक्षक कठडा बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१३-०९-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.

एरंडी वाडीजळवळचा रस्ता वाहतूकीस सुस्थितीत असून एका बाजूला खोल दरी असल्याने संरक्षकभिंत बांधणे आवश्यक आहे.

(३) अशाप्रकारचे निवेदन जिल्हा परिषद व ग्राम विकास विभागाकडे प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.

(४) बांधतिवरे-एरंडीवाडी रस्ता इतर जिल्हा मार्ग क्रमांक १२ दर्जाचा आहे. सदर रस्त्याच्या सा.क्र.१/९०० ते २/१०० (२०० मी.) मध्ये रस्त्याच्या बाजुला खोल दरी असल्याने संरक्षकभिंत (कठडा) बांधणे आवश्यक आहे.

रस्ते व पुल दुरुस्तीच्या योजनांमध्ये सदर ठिकाणच्या संरक्षक भिंत बांधण्याचे काम जिल्हा परिषदेद्वारे प्रस्तावित करण्यात येत असून निधीच्या उपलब्धतेनुसार काम हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर जिल्हयातील ग्रामीण भागातील रस्ते व पुल यासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत

**(४९) ६९४३४ (२५-०८-२०२३). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयात गेल्या पावसाळयात व पुरांमुळे ग्रामीण भागातील रस्ते, पुल वाहून गेले, उन्हाळयात रस्त्यांची दुरुस्ती व्हावी, यासाठी जिल्हा परिषदेने २०६ रस्त्यांच्या कामांसाठी ६० कोटींची मागणी जिल्हा नियोजन समितीकडे केली परंतू या कामासाठी ५ कोटींचा निधी मंजुर करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्हयासाठी यंदाच्या वर्षात अत्यंत अल्प निधी प्राप्त झाल्याने नागरिकांना पावसाळयात अडचणींना सामोरे जावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त जिल्हयातील रस्त्यांच्या कामांसाठी निधी उपलब्‍ा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१३-०९-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) जिल्हा परिषद, नागपूर करीता सन २०२३-२४ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत ग्रामीण रस्ते विकास व मजबूतीकरण (३०५४-२२०३) अंतर्गत रु.५००.०० लक्ष, इतर जिल्हा रस्ते विकास मजबुतीकरण लेखाशिर्ष ५०५४-४७११ अंतर्गत रु.५५००.०० लक्ष, जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत रु.६६५.०० लक्ष, जिल्हा रस्ते (टीएच-११०००३, टीएच-११०००४) अंतर्गत रु.४५५.०० लक्ष याप्रमाणे एकूण रु.७१२०.०० लक्ष नियतव्यय मंजूर करण्यात आलेला आहे.

३०५४ रस्ते व पूल, दुरुस्ती व परीरक्षण या कार्यक्रमांतर्गत व जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत (३०५४ व ५०५४) सन २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी नागपूर जिल्हा परिषदेस रु.८०६०.९४ लक्ष, सन २०२१-२२ मध्ये रु.९१३८.९९ लक्ष व सन २०२२-२३ मध्ये रु.७२९१.५६ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

तसेच अतिवृष्टी व पूरहानीमुळे क्षतीग्रस्त झालेल्या इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग दर्जांच्या रस्ते व पुलांच्या दुरुस्तीकरीता शासनाने दि.०९ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये अतिवृष्टी व पूरहानी कार्यक्रम (लेखाशिर्ष ३०५४ २९११) ही नवीन योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

वरीलप्रमाणे विविध योजनेंतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीमधून रस्ते/पुलाच्या दुरुस्तीची कामे जिल्हा परिषदेद्वारे केली जात आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सासोली (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदूर्ग) ग्रामपंचायतीमध्ये गैरव्यवहार केल्याबाबत**

**(५०) ६९६०२ (२५-०८-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सासोली (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदूर्ग) ग्रामपंचायतीचे माजी सरपंच यांची बनावट सही, ग्रामपंचायतीचा खोटा शिक्का व खोटे दस्तऐवज एका व्यक्तिने तयार करुन गैरव्यवहार केल्याची तक्रार विद्यमान सरपंचानी माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान स्थानिक पोलीस ठाण्यात केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगान संबंधीत दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात आली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१३-०९-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) श्री. सलज जैन यांनी दि.५/११/२०२० ते ३/११/२०२२ दरम्यान तहसीलदार कार्यालय दोडामार्ग येथे सासोली सं.नं.१५९/१ व सं.नं .१४३/१,१४५/१,व ११७/१ हि जमीन अकृषक करण्याकरीता सासोली ग्रामपंचायतीच्या तत्कालीन सरपंच सौ.दिपाली दयानंद धाऊसकर यांची बनावट सही,खोटा शिक्का व खोटे ग्रामपंचायतीचे दस्तऐवज तयार करून तहसीलदार कार्यालय, दोडामार्ग यांचेकडे सादर केले असल्याची बाब आढळून आली आहे. या प्रकरणी पोलीस ठाणे, दोडामार्ग यांच्यामार्फत चौकशी करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.